**MHNS280015062023**

<u>**नियमित दिवाणी दावा क्र.१४२/२०२३ मधील निशाणी क्र.३५ वरील आदेश**</u>.

**१.** प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र.३ ते ५, १०, १२ व १८ यांनी त्यांचे विरूध्दचा विना कैफियतचा आदेश रद्द होवून मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी असे नमुद करतात की, आवश्यक ती कागदपत्रांची उपलब्धता वेळेत न झाल्याने कैफियत दाखल करण्यास विलंब झालेला आहे. प्रतिवादींनी जाणुन बुजून विलंब केलेला नाही. सदर प्रतिवादींनी मुदतीत जबाब/कैफियत दाखल केली नसल्यामुळे दि.०५/११/२०२४ रोजी त्यांच्या विरूध्द विना कैफियतीचा आदेश झालेला आहे. सदर बाबींचा विचार होवुन सदर प्रतिवादींविरूध्द झालेला विना कैफियतीचा आदेश रद्द होवुन मिळवा अशी विनंती केली आहे.

**२.** याउलट वादीतर्फे विद्वान विधीज्ञांनी सदर प्रतिवादींतर्फे देण्यात आलेल्या विलंब माफ होवुन मिळण्यासाठीच्या अर्जावर त्यांचे म्हणणे सादर करून अर्जास आक्षेप नोंदविला आहे आणि सदरचा अर्ज रद्द व्हावा अशी विनंती केली आहे.

**३.** मी दोन्ही पक्षांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. दावा गुणवत्तेवर निकाली काढण्याकरीता प्रतिवादी क्र. क्र.३ ते ५, १०, १२ व १८ यांच्या विरूध्दचा विना कैफियतचा आदेश रद्द करणे न्यायोचित ठरेल. सदर कथन व वादीचा आक्षेप विचारात घेता माझ्या मते प्रतिवादींचा प्रस्तुतचा अर्ज मान्य केल्यास वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट प्रतिवादींचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर केल्यास भविष्यामध्ये दाव्यात गुंतागुंत वाढण्याची शक्यता जास्त आहे. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करतो.

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र.३५ मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. क्र.३ ते ५, १०, १२ व १८ यांच्या विरूध्दचा विना कैफियतीचा आदेश वादीस खर्च रक्कम रूपये ३००/— (तीनशे रूपये फक्त) देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो.

(प्रस्तुतचा आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

SACHIN HINDURAO KHADE
Digitally signed by SACHIN HINDURAO KHADE
Date: 2025.11.11 16:09:09 +0530

स्थळ :— सिन्नर.
दिनांक :— ११/११/२०२५.

(सचिन एच. खाडे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
सिन्नर.